# अंतिम वर्षाच्या प्रॅक्टिकल परिक्षांना प्रारंभ

अंतीम वर्षाचे एकूण विद्यार्थी...७५,०००

महाविद्यालये........................२९२

बॅकलॉगचे विद्यार्थी.................२५,०००

विषयनिहाय प्रश्नपत्रिका............१६००

विषय.....................................४७५

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठअंतर्गत असणाऱ्या महाविद्यालयांच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या आजपासून प्रॅक्टीकल परीक्षांना प्रारंभ झाला. पहिल्याच दिवशी ३२ अभियांत्रिकी आणि १८ फार्मसी महाविद्यालयातील परीक्षा पार पडल्या.

**पहिल्याच दिवशी इंजिनीअरींग, फार्मसीच्या परीक्षा**

विद्यापीठाच्या विद्यापरीषदेच्या बैठकीमध्ये अंतीम वर्षाच्या परीक्षा या ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने होणार आहेत. ही परीक्षा ५० गुणांची होणार असून सर्व प्रश्न वस्तूनिष्ठ आणि बहुपर्यायी असणार आहेत. ज्या विषयांची प्रात्यक्षिके झाली आहेत त्यांची ४० गुणांची परीक्षा होईल. १० गुण प्रात्यक्षिकांचे असतील. ज्यांचे प्रात्यक्षिक झाले नाही त्यांची मात्र ५० गुणांची परीक्षा होणार आहे. ऑफलाईन परीक्षांचाही पर्याय विद्यार्थ्यांना दिला आहे. दरम्यान १ ऑक्टोबर पूर्वी सर्व अभ्यासक्रमांच्या प्रॅक्टीकल परीक्षा पुर्ण करण्याचे आदेश संबंधीत महाविद्यालयांना दिले आहेत. विद्यापीठाच्या प्रणालीमध्ये त्या त्या दिवशी विद्यार्थ्यांचे मार्क भरावेत असे आवाहन परिक्षा नियंत्रक डॉ. गजानन पळसे यांनी केले.

# अंतिम वर्ष प्रात्यक्षिक परीक्षा सुरू

## ऑनलाईन व्हिडिओवरून झाली तोंडी परीक्षा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षांना आज प्रारंभ झाला. अभियांत्रिकी आणि फार्मसी शाखेची प्रात्यक्षिक परीक्षेला आज सुरुवात झाली. यामध्ये ऑनलाईन व्हिडिओवर तोंडी परीक्षा घेतली. या परीक्षा पुढील आठ दिवस चालणार आहेत.

कोरोनामुळे यंदा विद्यापीठ स्तरीय परीक्षा रद्द केल्या होत्या. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर परीक्षा घेणे बंधनकारक ठरले. विज्ञान, अभियांत्रिकी आणि फार्मसी शाखेच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा घेणे आवश्यक होते. ही परीक्षा दहा मार्कांची असणार आहे. कोरोनाचा संसर्ग असल्याने विद्यार्थ्यांनी प्रयोगशाळेत येऊन प्रत्यक्ष प्रयोग करणे शक्य नसल्याने त्यांची ऑनलाईन व्हिडिओद्वारे तोंडी परीक्षा घेतली जाणार आहे.

आज विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ३२ अभियांत्रिकी महाविद्यालये आणि १८ फार्मसी महाविद्यालयाच प्रात्यक्षिक परीक्षा झाल्या. १ ऑक्टोबरपर्यंत या परीक्षा पूर्ण करायच्या आहेत. त्यादृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

### प्रणालीत गुण भरा

महाविद्यालयांनी प्रात्यक्षिक परीक्षा झाल्याबरोबर तत्काळ विद्यार्थ्यांचे गुण विद्यापीठाच्या प्रणालीमध्ये भरावेत. त्यामुळे १ ऑक्टोबरपूर्वी परीक्षा विभागाचे गुणांची पुढील प्रक्रिया पूर्ण करणे शक्य होईल, असे आवाहन परीक्षा विभागाकडून करण्यात आले आहे.



## ऑनलाईन पद्धतीचा अवलंब : ३० सप्टेंबरपर्यंतच मुदत

# शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम सत्राच्या प्रात्यक्षिक परीक्षा सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम सत्रातील प्रात्यक्षिक आणि तोंडी परीक्षा मंगळवारपासून सुरु झाल्या. महाविद्यालय आणि विद्यापीठातील अधिविभागांकडून ऑनलाईन पद्धतीने या परीक्षा घेण्यात येत आहेत.

या परीक्षा घेण्याची अंतिम मुदत दि. ३० सप्टेंबरपर्यंत आहे. या परीक्षांमध्ये बी. एस्सी. अभ्यासक्रमांचे प्रमाण कमी आहे. बी. ए., बी. कॉम., बीबीए, बीसीए,, आदी अभ्यासक्रम अधिक आहेत. काही महाविद्यालयांनी मंगळवारपासून या परीक्षा घेण्यास सुरुवात केली. त्यासाठी विद्यार्थ्यांकडे उपलब्ध होणाऱ्या स्कायपी, झूम, गुगल मिट, आदी मीटिंग ॲपचा वापर करण्यात येत आहे.

विद्यार्थिसंख्या अधिक असलेल्या अभ्यासक्रमांचा परीक्षा आधी घेण्याचे नियोजन बहुतांश महाविद्यालयांनी केले आहे. परीक्षा झाल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थीनिहाय गुण विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील परीक्षा मंडळाने दिलेल्या लिंकवर जाऊन भरावयाची आहे.

दरम्यान, ऑनलाईन होणाऱ्या लेखी परीक्षेबाबतच्या सूचना मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वत:चा ईमेल, मोबाईल क्रमांक हा महाविद्यालयांकडे अद्ययावत करावा. महाविद्यालयांनी ही माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नोंदवावी, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

## आयटीआयची परीक्षा शुक्रवारपासून

कळंबा आयटीआयमार्फत शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा शुक्रवार (दि. १८) ते मंगळवार (दि. २२) दरम्यान होणार आहे. सीबीटी मोडद्वारे या परीक्षा घेण्यात येणार असल्याची माहिती कोल्हापुरात मूलभूत प्रशिक्षण तथा आनुषंगिक सूचना केंद्राच्यावतीने देण्यात आली आहे..

### वसतिगृहातील साहित्याचे आजपासून वाटप

जिल्हा प्रशासनाने विद्यापीठातील मुलांचे वसतिगृह क्रमांक एक ते तीन ताब्यात घेतली आहेत. ही वसतिगृहे ताब्यात देण्यापूर्वी तेथील विद्यार्थ्यांचे साहित्य विद्यापीठाने वसतिगृहातील एक ते दोन खोल्यांमध्ये एकत्रितपणे ठेवले होते. त्यामध्ये अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांच्या साहित्याचे अधिक प्रमाण आहे. ऑक्टोबरपासून होणाऱ्या लेखी परीक्षा लक्षात घेऊन विद्यापीठाकडून या विद्यार्थ्यांना संबंधित साहित्याचे आज, बुधवार ते शनिवारदरम्यान वाटप केले जाणार आहे.